महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

दूरध्वनी क्र.०२२-२२७९४०३२ Email ID:-napu15.mhpds@gov.in

---

**क्रमांक : ससेनि-१३२२/प्र.क्र. ६३/ना.पु.-१५** **जाहिरात क्रमांक : प्र.क्र.६३/२०२२**

**पुरावठा निरीक्षक, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३**

**पदवीधर अंशकालीन उमेदवार: कागदपत्र पडताळणी प्रक्रिया**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३ सर्वसाधारण गुणवत्ता यादी, दिनांक १९ जून, २०२४ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्यामध्ये पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचा दावा केलेल्या व पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचे विहित प्राधिकाऱ्यांनी/तहसिलदार यांनी दिलेले वैध प्रमाणपत्र असणाऱ्या सर्व उमेदवारांची संबंधित वैध प्रमाणपत्र पडताळणी त्यांच्या विभागातील उप आयुक्त(पुरवठा) कार्यालयात **दि.२०.०१.२०२५ ते दि.२२.०१.२०२५** दरम्यान राबविण्यात आली आहे.

सदर पडताळणीस मिळालेला प्रतिसाद पाहता प्रकरणी सर्वसाधारण गुणवत्ता यादीत नमूद पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचा दावा केलेल्या सर्व उमेदवारांना(यापूर्वी प्रमाणपत्र पडताळणी झालेले उमेदवार वगळून) संबंधित वैध प्रमाणपत्र पडताळणी त्यांच्या विभागातील उप आयुक्त(पुरवठा) कार्यालयात **दि.२९.०१.२०२५ ते दि.३१.०१.२०२५ व दि.०३.०२.२०२५** या कालावधीत राबविण्यात येत आहे.

२. **पदवीधर अंशकालीन उमेदवार यांच्याकरिता आरक्षण :-**

- शासन निर्णय,सा.प्र.वि., क्र. : पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९,
- शासन परिपत्रक,सा.प्र.वि., क्र. : अंशका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक १९.०९.२०१३,
- शासन परिपत्रक,सा.प्र.वि., क्र.: अंशका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक ०२.०१.२०१९,

तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

३. कागदपत्र तपासणीच्या वेळी पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचे विहित प्राधिकाऱ्यांनी दिलेले/वैध प्रमाणपत्र नसल्यास अशा उमेदवाराची पदवीधर अंशकालीन उमेदवारासाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात येणार नाही व सदर उमेदवारांचा निकालात समावेश केला जाणार नाही.

४. पदवीधर अंशकालीन उमेदवार प्रकारच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता (सामाजिक अथवा समांतर अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र उमेदवारांकडे असणे बंधनकारक आहे.

५. कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या **अंशकालीन उमेदवारांचा डेटा बेस** या यादीमध्ये राज्यातील अंशकालीन उमेदवार यांची माहिती देण्यात आली आहे. पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे या यादीमध्ये असणे आवश्यक आहे अन्यथा तो उमेदवार अंशकालीन आरक्षणसाठी अपात्र असेल.

६. समांतर आरक्षण प्रवर्गाच्या उमेदवाराच्या निवडीची प्रक्रिया सामाजिक आरक्षणाच्या अधीन राहून कशी केली जावी हे शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. १६.०३.१९९९ च्या शासन निर्णयात नमूद केले आहे. अंशकालीन उमेदवारास शासन निर्णय दि. २७.१०.२००९ अन्वये देऊ केलेले समांतर आरक्षण हे त्यास शासकीय नोकरी मिळविण्यास सहाय्यभूत ठरावे, ह्या उद्देशाने दिले आहे.

७.	शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र.:अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दि.१९ सप्टेंबर, २०१३ नुसार पदवीधर अंशकालीन उमेदवार या घटकाकरीता प्रस्तुत पदाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून दिनांक १६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्यात येतील.

८.	सदर कागदपत्र पडताळणी नंतर मूळ पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा निकाल घोषित केला जाईल व पात्र असणाऱ्या उमेदवारांना विभागाचे वाटप त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पसंतीक्रमानुसार गुणानुक्रमे व संबंधित विभागात पदवीधर अंशकालीन प्रवर्गात उपलब्ध जागांच्या अनुषंगाने करण्यात येईल.

९.	**पुरवठा निरीक्षक, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३ या परिक्षेची दिनांक १९ जून, २०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीत नमूद उमेदवारांपैकी पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचा दावा केलेल्या व पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचे विहित प्राधिकाऱ्यांनी/तहसिलदार यांनी दिलेले वैध प्रमाणपत्र असणाऱ्या उमेदवारांनी** (यापूर्वी प्रमाणपत्र पडताळणी झालेले उमेदवार वगळून) **दि.२९.०१.२०२५ ते दि.३१.०१.२०२५ व दि.०३.०२.२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत खालील नमूद कार्यालयापैकी एका कार्यालयात संबंधित वैध प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी पदवीधर अंशकालीन म्हणून दावा केलेल्या उमेदवारांना संबंधित वैध प्रमाणपत्र पडताळणीसाठी शेवटची संधी असून, यानंतर कोणत्याही उमेदवाराची पदवीधर अंशकालीन दाव्याच्या अनुषंगाने कोणतीही विनंती विचारात घेण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

## कागदपत्र पडताळणीकरीता संपर्क अधिकारी व संपर्क क्रमांक

| विभाग | उप आयुक्त (पुरवठा) | सहायक विभागीय पुरवठा अधिकारी व निरीक्षण अधिकारी(पुरवठा), उप आयुक्त (पुरवठा) कार्यालय यांचे नाव व संपर्क क्रमांक | |
|---|---|---|---|
| **कोकण** | श्री. अनिल टाकसाळे | श्री. अमोल पळसपगार,स.वि.पु.अ., कोकण विभाग. | ९६६५७०८९०२ |
| | | श्री. प्रसाद खरात, तांत्रिक अधिकारी,कोकण विभाग. | ९८९२७७७२५७ |
| **पुणे** | श्री. रमेश बेंडे | श्री. दिनेश तावरे, स.वि.पु.अ., पुणे विभाग. | ८४८४८३०८५० |
| | | श्री. विनय लिखार, नि.अ.,उ.आ.(पु.) का., पुणे विभाग. | ८१४९४७४५४४ |
| **नाशिक** | श्रीम.प्रज्ञा बडे-मिसाळ | श्रीम. स्मिता दळवी, स.वि.पु.अ., नाशिक विभाग. | ८९९९१९७१३९ |
| | | श्री. आदित्य पाटील, नि.अ.,उ.आ.(पु.) का.,नाशिक विभाग. | ९०२१६४८९७६ |
| **छत्रपती संभाजीनगर** | श्री. अनंत गव्हाणे | श्रीम. स्मिता ढोके, स.वि.पु.अ.,छ.संभाजीनगर विभाग. | ७०३८०२८२०८ |
| | | श्री. संदीप जाधव, नि.अ.,उ.आ.(पु.) का.,छ.संभाजीनगर विभाग. | ९७३०९४८२५२ |
| **अमरावती** | श्री. रमेश आडे | श्री. शैलेश देशमुख, स.वि.पु.अ., अमरावती विभाग. | ९८९०८३८९७१ |
| | | श्री. कमलेश वानखेडे, अ.का.,उ.आ.(पु.) का.,अमरावती विभाग. | ९०४९६५६९४८ |
| **नागपूर** | श्री. अनिल बन्सोड | श्री. पंकज जळेकर, स.वि.पु.अ., नागपूर विभाग. | ९८८१५८६६८१ |
| | | श्रीम. विभावरी अबगड, नि.अ.,उ.आ.(पु.) का.,नागपूर विभाग. | ७२७६३६७३७० |

(रामचंद्र धनावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

स्थळ : मुंबई.
दिनांक : २९ जानेवारी, २०२५.